MHAM010018492024

दाखल दिनांक : २९.०४.२०२४

नोंदणी दिनांक : २९.०४.२०२४

निकाल दिनांक : ०८.०७.२०२६

कालावधी : वर्ष ०२ महीना ०२ दिवस ०९

**भाग-अ**

**परिच्छेद क्र. ४४ (i) चाप्टर ६ क्रिमीनल म्यॅनुअल**

| अतिरिक्त सत्र न्यायाधीश (क्रमाक ३) यांचे न्यायालय, अमरावती<br>(पिठासिन अधिकारी- पी.पी.शर्मा)<br>निकाल तारीख ०८ जुलै, २०२६ | |
|---|---|
| **सत्रवाद क्र. ९२/२०२४** | **निशाणी- /अ** |
| अपराध क्र. १८२/२०२४, | पोलीस स्टेशन- गाडगेनगर |
| **सरकारपक्ष..** | **महाराष्ट्र शासन मार्फत,**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे,<br>गाडगेनगर, अमरावती शहर. |
| **सरकार तर्फे सहाय्यक सरकारी वकील** | **श्री. तपाडीया, सहा. सरकारी वकील.** |
| **आरोपी..** | भारत उर्फ मख्खी अर्जुन घुगे,<br>वय अंदाजे २६ वर्ष,<br>रा. विलास नगर, अमरावती. |
| **आरोपी तर्फे वकील** | **श्री. मेश्राम** |

**भाग 'ब'**

**परिच्छेद क्र. ४४ (ii) चाप्टर ६ क्रिमीनल म्यॅनुअल**

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १८.०२.२०२४ |
| छापील फिर्यादीची तारीख | १९.०२.२०२४ |
| दोषारोप पत्राची तारीख | १९.०४.२०२४ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | ०९.०२.२०२६ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२.०४.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | ०७.०७.२०२६ |
| निकालाची तारीख | ०८.०७.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | निरंक |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | आरोपी अटक दिनांक | आरोपीचा जामीन दिनांक | गुन्हा कलम | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | शिक्षा असल्यास काय | फौ.प्र.स.कलम ४२८ प्रमाणे फायदा देण्यात आला काय? |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भारत उर्फ मख्खी अर्जुन घुगे, | १९.०३. २०२४ | २४.०६. २०२४ | कलम ३९७ भादंसं. १८६०, कलम ४ सह २५ आर्म ॲक्ट, कलम १३५ व १४२ मु.पो.ॲक्ट. | निर्दोष सोडले. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ०८.०७.२०२६)

आरोपी विरूध्द कलम ३९७ भारतीय दंड संहिता १८६०, कलम ४ सह कलम २५ आर्म ॲक्ट, कलम १३५ व १४२ मुंबई पोलीस कायदा अन्वये दोषारोप पत्र दाखल झाले आहे.

२. अभियोग पक्षाचा संक्षिप्तपणे खटला असा आहे की, दिनांक १८/०२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता फिर्यादी नामे सचिन (सा.क्र.१) हा रंग कामाकरीता गेला होता. त्याला मजुरीचे रुपये ५००/- मिळाले होते. संध्याकाळी ७.३० वाजता फिर्यादी हा विलास नगर, मधुन जात होता. त्यावेळेस आरोपी हा त्याला भेटला. आरोपीने त्याला अडविले व दारु पिण्याकरीता पैशाची मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे, आरोपीने त्याच्या जवळील चाकु काढला व फिर्यादीवर फिरकावुन मानेजवळ, उजव्या डोळयाचे

बाजुला व चेह-यावर मारुन जखम केली. आरोपीने फिर्यादीचे पॅटचे खिशातुन रुपये ५००/- देखील हिसकाउन घेतले. फिर्यादीने वरील घटनेबाबत गाडगेनगर पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

३. फिर्यादीने दिलेला रिपोर्ट (नि.क्र.४०) च्या आधारे आरोपी विरुध्द अपराध क्र.१८२/२०२४ प्रमाणे पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंदविण्यात आला. तुळशिराम (सा.क्र.३) गुन्हयाचा तपास केला. त्यांनी घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२८) तयार केला. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. तपासादरम्यान निवेदन पंचनामा (नि.क्र.४२) प्रमाणे एक चाकु जप्त केला व मेमारॅडम पंचनामा (नि.क्र.४३) तयार केला. पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर आरोपीविरूध्द कलम ३९७ भारतीय दंड संहिता १८६०, कलम ४ सह कलम २५ आर्म ॲक्ट, कलम १३५ व १४२ मुंबई पोलीस कायदा अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. विद्वान प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट नं.३) अमरावती यांनी दाखल खटला हा सत्र न्यायालयाद्वारे संपरिक्षा करता येणे जोगा असल्यामुळे विद्वान न्यायालयाने सदर खटला दिनांक २२.०४.२०२४ च्या आदेशान्वये या न्यायालयात सदर प्रकरण कमिटलचा आदेश करून पाठविले.

५. आरोपी विरुध्द कलम ३९७ भारतीय दंड संहिता १८६०, कलम ४ सह कलम २५ आर्म ॲक्ट, कलम १३५ व १४२ मुंबई पोलीस कायदा अन्वये दोषारोप (निशाणी १९) निश्चित केले. आरोपीस दोषारोप वाचुन दाखविले. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून खटल्याची सुनावणी व्हावी अशी विनंती केली. आरोपीने खोटी केस केल्याचा बचाव आणला.

६. आरोपी विरुध्द गुन्हयाचे सिध्दतेकरीता अभियोग पक्षाने एकुण

तिन साक्षीदारांना तपासले. सचिन (सा.क्र.१) फिर्यादी आहे. अविनाश (सा.क्र.२) पंच आहे. तुळशिराम (सा.क्र.३) तपास अधिकारी आहे. बचाव पक्षाने जखमांचे प्रमाणपत्र (नि.क्र.२९), घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२८) मान्य केला.

७. अभियोग पक्षाचा खटला, आरोपीवर निश्चित केलेले आरोप, आरोपीचा बचाव तसेच आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे बयाण यांच्या आधारे खालील मुद्दे उपस्थित झाले. ते मुद्दे त्यांच्या उत्तरासह व कारणासह खालीलप्रमाणे नमूद केलेले आहेत.

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १८/०२/२०२४ रोजी सायंकाळी ७:३० च्या सुमारास, गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विलास नगर येथे, जुनी आरामशीन जवळ, आरोपीने फिर्यादी सचिन उज्जैन काळे यांच्या कडुन रुपये ५००/- हिसकावून लुटालूट केली आणि सदर लुटालूट करतांना प्राणघातक शस्त्र (म्हणजेच चाकू) वापरून फिर्यादी सचिन यांना गंभीर दुखापत केली? | ...नाही |
| २ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, त्याच दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने शस्त्र कायद्याच्या कलम ४ सहकलम २५ चे उल्लंघन करून दरोडा टाकण्याच्या उद्देशाने प्राणघातक शस्त्र, म्हणजेच चाकु, बाळगून त्याची तयारी केली? | ...नाही. |
| ३ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, त्याच दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने, मुंबई पोलीस कायादाचे कलम ३७ (१)(३) अन्वये अमरावतीचे जिल्हा दंडाधिकारी यांनी जारी केलेल्या अधिसूचनेतील नियम व निर्देशांचे उल्लंघन केले? | ...नाही. |
| ४ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, त्याच दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने, ज्या आदेशाद्वारे | |

| | | |
|---|---|---|
| | हद्दपारीचे निर्देश दिले होते, त्याचे उल्लंघन करून त्या प्रतिबंधित क्षेत्रात, परवानगीशिवाय प्रवेश केला व आदेशाचे पालन केले नाही? | ...नाही. |
| ५ | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ५ करीता -**

८. सचिन (साक्षीदार क्र.१) हे फिर्यादी आहे. त्याने शपथेवर सांगितले की, घटनेच्या वेळेस तो कामावरुन घरी जात होता. त्यांच्याकडे डबा व २२००/- रुपये होते. घरी परत येत असतांना रस्त्यात त्याला एक व्यक्ती भेटली. सदर व्यक्तीसोबत त्याची हातपाई झाली. त्यामुळे त्याने आरोपी विरुध्द रिपोर्ट दिलेला आहे. परंतु सदर साक्षीदाराने ही बाब स्पष्टपणे नाकारली की, आरोपीने चाकुने मारहाण केली व खियातुन रुपये ५००/- हिसकावुन घेतले. त्याने जबानी रिपोर्ट दिल्याचे मान्य केले आहे. परंतु जबानी रिपोर्ट मधील मजकुर त्याने अमान्य केला आहे. सरकार पक्षातर्फे सचिन (सा.क्र.१) याचा उलटतपास घेण्यात आला. त्याच्या उलटतपासात आरोपी विरुध्द कोणताही पुरावा आलेला नाही.

९. अविनाश (साक्षीदार क्र.२) यांनी त्यांच्या साक्षमध्ये निवेदन पंचनामा अ.क्र.१ वर त्यांची सही असल्याचे मान्य केले. परंतु त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराचा उलटतपास अभियोग पक्षातर्फे घेण्यात आला. उलटतपासात अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही कबुली साक्षीदाराने दिलेली नाही.

१०. तुळशिराम (सा.क्र.३) यांनी शपथेवर सांगितले की, दिनांक १८/०२/२०२४ रोजी ते रात्रपाळी अधिकारी म्हणुन कर्तव्य बजावत होते. त्यांनी

सचिन काळे (सा.क्र.१) यांच्या सांगण्याप्रमाणे तक्रार लिहुन घेतली. त्यांनी या प्रकरणाचा तपास कसा केला याबाबत सविस्तर सांगितले आहे.

११. बचाव पक्षाने जखमांचे प्रमाणपत्र (नि.क्र.२९) मान्य केले आहे. याउपर, घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२८) देखील मान्य केला आहे.

१२. वरील साक्षी पुराव्यावर अभियोग पक्षाने आपली भिस्त ठेवलेली आहे. सदर पुराव्याचे अवलोकन केले. ज्याअर्थी, बचाव पक्षाने फिर्यादीला झालेल्या जखमा मान्य केल्या आहेत व दसु-या बाजुला फिर्यादीने सांगितले की, एका व्यक्ती सोबत त्याची हातपाई झाली होती, त्याअर्थी हे स्पष्ट होते की, एका व्यक्तीच्या हातापाईमुळे फिर्यादीला जखमा झालेल्या आहेत. सदर व्यक्ती ही आरोपीच आहे, याबाबत फिर्यादीने स्पष्ट नाकारले आहे की, आरोपीने त्याला मारहाण केलेली नाही व त्याच्याकडुन पैसे हिसकावुन घेतलेले नाही. आरोपीकडुन चाकु जप्त केला असे अभियोग पक्षाचे म्हणणे आहे परंतु, पंच साक्षीदार हा अभियोग पक्षाला मदत करीत नाही. त्यामुळे, आरोपीने निवेदन दिले व चाकु हजर करुन दिला हे देखील शाबीत होत नाही. एकंदरीत, वरील साक्ष पुराव्यावरुन शाबीत झालेले नाही की, आरोपीनेच फिर्यादीला मारहाण केली व त्याच्याकडुन पैसे हिसकावुन घेतले. त्यामुळे, मी, मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर वरील प्रमाणे देत आहे व मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१.. आरोपीस कलम ३९७ भारतीय दंड संहिता, १८६०, तसेच कलम ४ सह कलम २५ आर्मस ॲक्ट व कलम १३५ व १४२ मुंबई पोलीस कायदा अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२.. आरोपी हा न्यायबंदी असल्यामुळे त्यास ईतर गुन्हयात आवश्यक्ता नसल्यास ताबडतोब सोडुन देण्यात यावे.

३.. जप्त लोखंडी पाते व मुठ असलेला चाकु हा जिल्हाधिकारी यांना अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता करीता पाठविण्यात यावा.

४.. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७(अ) चे तरतुदीप्रमाणे रु.१५,०००/- वैयक्तिक मुचलका व तेवढ्याच रकमेचा एक जामीनदार दयावा.

PREMKUMAR PUNAMCHAND SHARMA
Digitally signed by PREMKUMAR PUNAMCHAND SHARMA
Date: 2026.07.08 13:31:37 +0530

(पी.पी.शर्मा)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
( कोर्ट क्र.३) , अमरावती.

दिनांक : ०८.०७.२०२६

**भाग 'क'**

**परिच्छेद क्र. ४४(iii) चाप्टर ६ क्रिमीनल म्यॅनुअल**

**अभियोगपक्षाने/ आरोपीने/ न्यायालयाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :-**

| साक्षीदार क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | सचिन उज्ञेन काळे | फिर्यादी |
| २ | अविनाश सुभाषराव आकोटकर | पंच. |
| ३ | तुळशिराम मानिकराव ठाकुळकर | तपास अधिकारी. |

**ब. <u>बचाव पक्षाचे साक्षीदार असतील तर</u> :-**

| साक्षीदार क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. <u>न्यायालयीन साक्षीदार असतील तर</u> :-**

| साक्षीदार क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयाने दिलेली निशाणीची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :-**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ४० | रिपोर्ट |
| २ | ४१ | प्रथम खबरी अहवाल |
| | ४२ | निवेदन पंचनामा |
| | ४३ | मेमोरॅडम पंचनामा |
| | ४४ | क्युरी पत्र |
| | ४५ | क्सुरी रिपोर्ट |
| | ४६ | तडीपार आदेश |

**ब. <u>बचाव पक्ष</u> :-**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. <u>न्यायालयाने कागदपत्रांना दिलेल्या निशाणी</u> :-**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**जप्त केलेली वस्तु (Material Object)**

| अ. क्र. | जप्त केलेली वस्तु | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

PREMKUMAR PUNAMCHAND SHARMA

Digitally signed by PREMKUMAR PUNAMCHAND SHARMA
Date: 2026.07.08 13:31:46 +0530

(पी.पी.शर्मा)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
( कोर्ट क्र.३), अमरावती.

दिनांक : ०८.०७.२०२६